Test Booklet Code & No.
प्रश्नपत्रिका कोड व क्र.

| C |
|---|

# Paper-II
# EDUCATION

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

2. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

Seat No. [ | | | | | ]

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. [ | | | | | ]

(To be filled by the Candidate)

## MAY - 70216

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **50** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी आवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Education
## Paper II
# शिक्षाशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This Paper contains **Fifty (50)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. We have to determine the scale value and quartile value for every statement while preparing ..........
   (A) Likert's Technique
   (B) Thurstone's Attitude scale
   (C) Guttman's scale
   (D) Binet's Intelligence scale

2. "Motivation is not necessary for learning but it determines where a learner should focus his attention." This statement is supported by .............
   (A) E.R. Guthrie
   (B) Kurt Lewin
   (C) Edward Tolman
   (D) Robert Gagne

1. खालीलपैकी ............ तयार करताना आपल्याला प्रत्येक विधानाचे श्रेणीमूल्य व चतुर्थकमूल्य काढावे लागते.
   (A) लिकर्टचे तंत्र
   (B) थर्स्टनची वृत्तीमापक श्रेणी
   (C) गटमनची श्रेणी
   (D) बिनेटची बुद्धिमापन श्रेणी

2. 'अध्ययनासाठी प्रेरणेची आवश्यकता नसली तरी विद्यार्थ्यांचे अवधान केंद्रीकरण होण्यासाठी प्रेरणा उपयुक्त ठरते.' या विधानाचे समर्थन ............ यांनी केला आहे.
   (A) इ.आर. गुथ्री
   (B) कर्ट लेविन
   (C) एडवर्ड टोलमन
   (D) रॉबर्ट गॅने

3. According to ............ reading books is a motivation for achieving success in the examination.

(A) Cognitive theory

(B) Expectancy theory

(C) Arousal theory

(D) Drive theory

4. Rajaram has never reached the finals in any of the athletic meets but imagines himself running at the Olympics and returning home with a gold medal. This is an example of .............. defence mechanism..

(A) Projection

(B) Day dreaming

(C) Rationalization

(D) Compensation

5. Heena avoids study of Mathematics, so she needs assitance from .......

(A) Psychologist

(B) Psychiatrist

(C) Guide

(D) Counsellor

3. परीक्षेत यश संपादन करण्यासाठी विद्यार्थी पुस्तक वाचतो. ही प्रेरणा या ............ शी निगडीत आहे.

(A) बोधात्मक उपपत्ती

(B) अपेक्षावस्था उपपत्ती

(C) जागरूक उपपत्ती

(D) प्रचोदना उपपत्ती

4. ॲथलिटिक्सच्या अंतिम फेरीपर्यंत राजाराम पोहोचू शकला नाही, परंतु ऑलॅम्पिकच्या धावण्याच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवून घरी परत आल्याची कल्पना करतो, हे उदाहरण ........... ह्या संरक्षण यंत्रणेचे आहे.

(A) प्रक्षेपण

(B) दिवास्वप्नरंजन

(C) समर्थन

(D) प्रतिपुरण

5. हीना गणीताचा अभ्यास करणे टाळते. म्हणून तिला ............. च्या मदतीची आवश्यकता आहे.

(A) मानसशास्त्रज्ञ

(B) मानसोपचारतज्ज्ञ

(C) मार्गदर्शक

(D) समुपदेशक

6. Alia's intelligence quotient is 85, then according to Sandiford's classification she will be in the category of ...........

   (A) Moron

   (B) Below normal

   (C) Normal

   (D) Imbecile

6. आलियाची बुद्ध्यांक 85 असेल तर सँडिफोर्ड यांच्या वर्गीकरणानुसार तिचा ............ या गटात समावेश होईल.

   (A) मंदबुद्धी

   (B) अल्प सामान्य

   (C) सामान्य

   (D) जडबुद्धी

7. 'The personality of the person can be understood by studying one's style of life.' This thought was given by .......

   (A) Maslow

   (B) Adler

   (C) Freud

   (D) Eyesenck

7. 'एखाद्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व त्याच्या जीवन-शैलीवरून समजून घेता येते.' हा विचार ........... यांनी सांगितला आहे.

   (A) मॅस्लो

   (B) ॲडलर

   (C) फ्राईड

   (D) आयसेन्क

8. Laboratory experiments are conducted :

   (A) Using anecdotal records

   (B) Under carefully arranged and controlled conditions

   (C) Using Latin Square Design

   (D) Using Single Subject Design

8. प्रयोगशाळेतील प्रयोग ................. केले जातात.

   (A) प्रासंगिक नोंदी वापरून

   (B) काळजीपूर्वक आयोजित व नियंत्रीत केलेल्या परिस्थितीमध्ये

   (C) लॅटिन स्क्वेअर अभिकल्प वापरून

   (D) एक व्यक्ती (Subject) अभिकल्प वापरून

9. The following is *not* an example of descriptive research :
   (A) Correlational research
   (B) Survey research
   (C) Causal-comparative research
   (D) Pre-test Post-test research

10. Historical research should include .........
    (A) Internal and external criticism of data
    (B) Reliability coefficient for tools
    (C) Factorial design
    (D) Counter-balanced design

11. Selection of a tool for research is dependent on ............
    (A) Sample of research
    (B) Objectives of research
    (C) Population of research
    (D) Analysis of research

9. खालीलपैकी ............ हे वर्णनात्मक संशोधनाचे उदाहरण **नाही**.
   (A) सहसंबंधात्मक संशोधन
   (B) सर्वेक्षण संशोधन
   (C) कारणमीमांसा तुलनात्मक संशोधन
   (D) पूर्वचाचणी-उत्तरचाचणी संशोधन

10. ऐतिहासिक संशोधनामध्ये .............. याचा समावेश असला पाहिजे.
    (A) माहितीची आंतरिक आणि बाह्य मीमांसा
    (B) साधनांचा विश्वसनीयता सहगुणक
    (C) घटकात्मक अभिकल्प
    (D) काउंटर-बॅलन्सड् अभिकल्प

11. संशोधनासाठीच्या साधनाची निवड ........... अवलंबून असते.
    (A) संशोधनाच्या नमुन्यावर
    (B) संशोधनाच्या उद्दिष्टांवर
    (C) संशोधनाच्या जनसंख्येवर
    (D) संशोधनाच्या प्रकारावर

12. 'It is as short as possible and only long enough to get the essential data' is a characteristic of .........
    (A) a good questionnaire
    (B) an attitude scale
    (C) an interest inventory
    (D) an intelligence test

13. Educationists need to be knowledgeable consumers of educational research to ...........
    (A) keep abreast of the changes and improvements in educational research
    (B) be a modern teacher
    (C) have in-depth knowledge
    (D) make the class interesting

14. Scientific theories are developed through ............
    (A) Tool construction
    (B) Applied research
    (C) Fundamental research
    (D) Action research

12. ''शक्य तितकी छोटी (कमी लांबीची) आणि आवश्यक तेवढी माहिती (Data) मिळण्याइतपत पुरेशी मोठी (जास्त लांबीची) असते.'' हे ............... चे वैशिष्ट्ये आहे.
    (A) चांगली प्रश्नावली
    (B) अभिवृत्ती श्रेणी
    (C) अभिरुची शोधिका
    (D) बुद्धिमत्ता चाचणी

13. शिक्षणज्ज्ञांना शैक्षणिक संशोधनाचे ज्ञानी ग्राहक असणे ............ यासाठी गरजेचे असते.
    (A) शैक्षणिक संशोधनातील बदल आणि प्रगती यांचे ज्ञान अद्ययावत होणे
    (B) आधुनिक शिक्षक होणे
    (C) सखोल ज्ञान असणे
    (D) वर्ग अभिरुची पूर्ण होणे

14. वैज्ञानिक उपपत्ती ............ द्वारे विकसित होतात.
    (A) साधनाची रचना
    (B) उपयोजित संशोधना
    (C) मूलभूत संशोधना
    (D) कृती संशोधना

15. The entire mass of data being considered for research maintaining the characteristic of the population is the advantage in ............
    (A) Lottery method
    (B) Census method
    (C) Systematic sampling method
    (D) Quota sampling method

16. 'Data analysis is simple, responses can be directly compared and easily aggregated and many questions can be asked in a short time.' This is the strength of ..........
    (A) Informal conversational interview
    (B) Interview-guided approach
    (C) Closed, fixed response interview
    (D) Standardized open-ended interview

17. An operation by which data are organized into classes and number of symbol is given to each item to the class in which it falls is called ..........
    (A) grouping
    (B) classifying
    (C) decoding
    (D) coding

15. संशोधनासाठी विचारात घेतलेल्या संपूर्ण माहितीमध्ये जनसंख्येची वैशिष्ट्ये जपली जाणे हा फायदा .............. मध्ये असतो.
    (A) लौटरी पद्धत
    (B) जनगणना पद्धत
    (C) नियमबद्ध नमुना निवड पद्धत
    (D) निर्दिष्टांश नमुना निवड पद्धत

16. 'माहिती विश्लेषण सोपे असते. मिळालेल्या माहितीची तुलना करता येते आणि सहजपणे एकत्रित करता येते. थोड्या वेळात जास्त प्रश्न विचारता येतात.' हे .............. याचे बलस्थान आहे.
    (A) अनौपचारिक संभाषणात्मक मुलाखत
    (B) मार्गदर्शित मुलाखत
    (C) बंदिस्त, निश्चित प्रतिसाद मुलाखत
    (D) प्रमाणित मुक्त मुलाखत

17. ज्या क्रियेमध्ये संकलित माहितीच्या (Data) प्रत्येक घटकाचे (Item) तो अंतर्भूत असलेल्या गटानुसार संघटन करून विविध चिन्हे दिली जातात, त्या क्रियेस ....................... असे म्हणतात.
    (A) गट तयार करणे
    (B) वर्गीकरण करणे
    (C) नि:सांकेतिकीकरण
    (D) सांकेतिकीकरण

18. ............... statistical technique is a non-parametric technique.

(A) Pearson's $r$

(B) ANOVA

(C) Chi-square

(D) ANCOVA

18. संख्याशास्त्रीय तंत्रापैकी ............ हे अपरिमितीय तंत्र आहे.

(A) पिअरसनचा $r$

(B) ANOVA

(C) काय-स्केवर

(D) ANCOVA

19. One-tailed test statistics is used in case of a ............

(A) Directional hypothesis

(B) Non-directional hypothesis

(C) Null-hypothesis

(D) Question form hypothesis

19. ............ साठी एकपुच्छ कसोटी सांख्यिकी उपयुक्त असते.

(A) दिशादर्शक परिकल्पना

(B) अदिशादर्शक परिकल्पना

(C) शून्य परिकल्पना

(D) प्रश्नस्वरूप परिकल्पना

20. The following are the measures of central tendency :

(A) Skewness and kurtosis

(B) Standard deviation and dispersion

(C) Measures of location within a distribution

(D) Variance and average deviation

20. खालीलपैकी कोणते केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे आहेत ?

(A) विषमितता आणि शिखरदोष

(B) प्रमाण विचलन आणि प्रसरण (Dispersion)

(C) वितरणातील स्थाननिश्चितीची परिमाणे

(D) प्रसरण (Variance) आणि सरासरी विचलन

21. 'Knowledge is a virtue.' This statement was stated by ........
    - (A) Plato
    - (B) Socrates
    - (C) Mahatma Gandhi
    - (D) Rabindranath Tagore

22. 'There is no ultimate truth in the world.' This statement is one of the assumption of ...........
    - (A) Idealism
    - (B) Pragmatism
    - (C) Spiritualism
    - (D) Naturalism

23. Instrumentalism is the name of ..........
    - (A) Pragmatism
    - (B) Idealism
    - (C) Realism
    - (D) Spiritualism

21. 'ज्ञान म्हणजे सद्‌गुण' हे विधान ........... ने केले आहे.
    - (A) प्लेटो
    - (B) सॉक्रेटिस
    - (C) महात्मा गांधी
    - (D) रविंद्रनाथ टागोर

22. 'विश्वामध्ये कोणतेही अंतिम सत्य नाही.' हे विधान .............. गृहीततत्त्व आहे.
    - (A) आदर्शवादाचे
    - (B) कार्यवादाचे
    - (C) अध्यात्मवादाचे
    - (D) निसर्गवादाचे

23. साधनवाद हे .............. चेच नाव आहे.
    - (A) कार्यवाद
    - (B) आदर्शवाद
    - (C) वास्तववाद
    - (D) अध्यात्मवाद

24. 'Man is a social animal.' This is not a belief in ............

(A) Realism

(B) Existentialism

(C) Naturalism

(D) Idealism

24. 'मनुष्य हा समाजशील प्राणी आहे.' यावर .......... विश्वास ठेवत नाही.

(A) वास्तववाद

(B) अस्तित्ववाद

(C) निसर्गवाद

(D) आदर्शवाद

25. To search the ultimate truth is the subject of study in ............

(A) Ontology

(B) Epistemology

(C) Axiology

(D) Ethics

25. अंतिम सत्याचा शोध घेणे हा ............... अभ्यास विषय आहे.

(A) तत्त्वमीमांसेचा

(B) ज्ञानमीमांसेचा

(C) मूल्यमीमांसेचा

(D) नीतीशास्त्राचा

26. 'Education should be linked to productive work.' This statement is a reflection of ........................ philosophy.

(A) Marxism

(B) Fascism

(C) Capitalism

(D) Socialism

27. 'The world is full of sorrow.' This is one of the ultimate truths given by .............

(A) Jain Philosophy

(B) Buddhist Philosophy

(C) Vedic Philosophy

(D) Upanishad Philosophy

26. 'शिक्षण हे उत्पादक कार्याशी जोडले गेले पाहिजे.' ह्या विधानातून .............. तत्त्वज्ञान प्रतिबिंबित होते.

(A) मार्क्सवादी

(B) फॅसिझमवादी

(C) भांडवलवादी

(D) समाजवादी

27. 'सर्व विश्व हे दु:खाने भरून राहिलेले आहे.' हे 'अंतिम सत्य' ....... सांगितलेले आहे.

(A) जैन तत्त्वज्ञानाने

(B) बौद्ध तत्त्वज्ञानाने

(C) वैदिक तत्त्वज्ञानाने

(D) उपनिषदीय तत्त्वज्ञानाने

28. 'Religion is the innermost core of education.' This statement was stated by ...................

(A) Shankaracharya

(B) Sir Aurobindo Ghosh

(C) Rabindranath Tagore

(D) Swami Vivekananda

29. We give equal treatment to all the people from different religions because we have accepted ........... in our constitution.

(A) Justice

(B) Equality

(C) Secularism

(D) Fraternity

28. 'धर्म हा शिक्षणाच्या अंतरंगातील गाभा आहे.' हे विधान ................ यांनी केले आहे.

(A) शंकराचार्य

(B) सर अरविंद घोष

(C) रविंद्रनाथ टागोर

(D) स्वामी विवेकानंद

29. आपण सर्व धर्मातील लोकांना समान न्याय देतो, कारण आपण आपल्या राज्यघटनेमध्ये ......... स्वीकार केलेला आहे.

(A) न्यायाचा

(B) समानतेचा

(C) धर्मनिरपेक्षतेचा

(D) बंधुतेचा

30. Any school which receives grant from State or Central Govt. cannot compel the students to participate in religious activities in schools. This is stated in the ........... of the Indian Constitution.

(A) Article 25

(B) Article 29

(C) Article 30

(D) Article 38

31. 'Concept of knowledge is primitive and undefinable.' This statement was stated by ...........

(A) John Cook Virsan

(B) Russell

(C) Mill

(D) Hume

30. कोणतीही शाळा की जी राज्यशासनाकडून किंवा केंद्रशासनाकडून अनुदान घेत असेल तर ती शाळा विद्यार्थ्यांना शाळेमध्ये धार्मिक कार्यासाठी सक्ती करू शकत नाही. हे भारतीय राज्यघटनेतील ................ कलमामध्ये दिलेले आहे.

(A) कलम 25

(B) कलम 29

(C) कलम 30

(D) कलम 38

31. 'ज्ञानाची संकल्पना ही आदिम व अव्याख्यायीत अशी आहे.' हे विधान .......... ने केलेले आहे.

(A) जॉन कुक विरसन

(B) रसेल

(C) मिल

(D) ह्युम

32. Logical positivism is the reaction against :
   (A) Naturalism
   (B) Pragmatism
   (C) Idealism
   (D) Realism

33. Ashramshalas have been specifically established for the education of :
   (A) Rural children
   (B) Girl child
   (C) Gifted child
   (D) Tribal child

32. तार्किक प्रत्यक्षतावाद ही ............ ची प्रतिक्रिया होय.
   (A) निसर्गवाद
   (B) कार्यवाद
   (C) आदर्शवाद
   (D) वास्तववाद

33. आश्रमशाळांची स्थापना प्रामुख्याने ............ यांच्या शिक्षणासाठी केली आहे.
   (A) ग्रामीण मुले
   (B) मुली
   (C) प्रज्ञावान बालके
   (D) आदिवासी मुले

34. 'Education for democracy' implies that education teaches you ...............

(A) Pragmatic conception of knowledge

(B) Vital conscious attitudes

(C) Social reforms

(D) Industrialisation

35. Secular traditions in education in India does not support :

(A) Multicultural education

(B) Positive discrimination

(C) Religious education

(D) Modernisation

34. 'लोकशाहीसाठी शिक्षण' याचा अर्थ म्हणजे शिक्षण तुम्हाला ............... शिकविते.

(A) ज्ञानाचे कार्यवादी संबोधीकरण

(B) प्रमुख सजग दृष्टिकोन

(C) सामाजिक सुधार

(D) औद्योगिकीकरण

35. भारतात शिक्षणातील धर्मनिरपेक्ष परंपरा ....... ला आधार देत नाहीत.

(A) बहुसांस्कृतिक शिक्षण

(B) धनात्मक भेद

(C) धार्मिक शिक्षण

(D) आधुनिकीकरण

36. Social equality is mostly supported by ..........

(A) Capitalism

(B) Anarchy

(C) Monarchy

(D) Socialism

36. सामाजिक समतेला सर्वात जास्त आधार ........ मुळे मिळतो.

(A) भांडवलवाद

(B) अनागोंदी कारभार

(C) राजेशाही

(D) समाजवाद

37. Differences in the society is based on socio-economic aspects such as wealth, power and prestige is known as ...............

(A) Social change

(B) Social mobility

(C) Social progress

(D) Social stratification

37. संपत्ती, शक्ती व प्रतिष्ठा यांसारख्या सामाजिक-आर्थिक पैलूंवर आधारीत समाजातील फरकांना ............... असे म्हणतात.

(A) सामाजिक परिवर्तन

(B) सामाजिक गतिशीलता

(C) सामाजिक प्रगती

(D) सामाजिक स्तरीकरण

38. Which of the following statements is *not* correct ?

(A) Education leads to social change

(B) Social change influences education

(C) Education leads to social mobility

(D) Social mobility is a hindrance to education

39. School is a miniature ..............

(A) Society

(B) Politics

(C) Economy

(D) Organisation

40. Education leads to ............

(A) Political and social control

(B) Political and social peace

(C) Political socialisation

(D) Imbalance in political and social system

38. खालीलपैकी कोणते विधान बरोबर **नाही** ?

(A) शिक्षणामुळे सामाजिक परिवर्तन होते

(B) सामाजिक परिवर्तनाचा शिक्षणावर प्रभाव पडतो

(C) शिक्षणामुळे सामाजिक गतिशीलता येते

(D) सामाजिक गतिशीलता ही शिक्षणातील अडथळा आहे

39. शाळा ही ............ ची छोटी प्रतिकृती आहे.

(A) समाज

(B) राजकारण

(C) अर्थकारण

(D) संघटना

40. शिक्षणामुळे ........... होते.

(A) राजकीय आणि सामाजिक नियंत्रण

(B) राजकीय आणि सामाजिक शांतता

(C) राजकीय सामाजिकीकरण

(D) राजकीय व सामाजिक प्रणालीतील असंतुलन

41. Indicators of individual modernity are .........

(A) Geographical mobility, democratic and social attitudes

(B) Wearing of western clothes

(C) Education in English medium schools

(D) High rise buildings, technologial modes of communication, well laid out roads

42. Family provides ........... type of education to a child.

(A) Distance mode

(B) Formal

(C) Non-formal

(D) Informal

41. व्यक्तिगत आधुनिकतेचे दर्शक म्हणजे .........

(A) भौगालिक गतिशीलता, लोकशाही आणि सामाजिक दृष्टीकोन

(B) पाश्चात्य वस्त्रे परिधान करणे

(C) इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेणे

(D) गगनचुंबी इमारती, दळणवळणाचे तांत्रिक मार्ग, सुव्यवस्थित रस्ते

42. कुटुंब मुलाला ........... प्रकारचे शिक्षण पुरविते.

(A) दूरस्थ

(B) औपचारिक

(C) अनौपचारिक (Non-formal)

(D) सहज (Informal)

43. School is a social institution because it ..........

    (A) Preserves and instills knowledge, ideas and culture in future generations

    (B) Suggest ways and means of social progress

    (C) Suggests solutions to social problems

    (D) Is established by the society to fulfill specific functions

44. The scope of educational sociology is ............

    (A) Determining the individual aims of education

    (B) Studying education sociologically

    (C) Developing new knowledge

    (D) Studying behaviour of students

43. शाळा ही एक सामाजिक संस्था आहे. कारण ..........

    (A) ती भावी पिढ्यांमध्ये ज्ञान, कल्पना आणि संस्कृती यांचे जतन व संवर्धन करते

    (B) ती सामाजिक प्रगतीचे मार्ग आणि साधने सुचविते

    (C) ती सामाजिक समस्या निराकरणाचे मार्ग सुचविते

    (D) तिची समाजाने विशिष्ट कार्यपूर्तीसाठी स्थापना केली आहे

44. शैक्षणिक समाजशास्त्राची व्याप्ती ............ याचा असते.

    (A) शिक्षणाच्या वैयक्तिक ध्येयांचे निश्चितीकरण

    (B) सामाजिकदृष्ट्या शिक्षणाचा अभ्यास

    (C) नवीन ज्ञानाचे विकसन

    (D) विद्यार्थी वर्तनाचा अभ्यास

45. Sociology of education is the study of ...............

(A) sociology and education

(B) how sociology is used in education

(C) why sociology is used in education

(D) how social institutions affect education and its outcomes

46. At any stage of development, individual's behaviour is nothing but an end product of heredity and environment. This is the ..........

(A) Principle of Interrelation

(B) Principle of Interaction

(C) Principle of Integration

(D) Principle of Uniformity pattern

45. शिक्षणाच्या समाजशास्त्रामध्ये ............ याचा अभ्यास केला जातो.

(A) समाजशास्त्र आणि शिक्षण

(B) समाजशास्त्राचा शिक्षणात कसा उपयोग केला जातो

(C) समाजशास्त्राचा शिक्षणात का उपयोग केला जातो

(D) सामाजिक संस्था शिक्षणावर कसा परिणाम करतात आणि त्याची फलिते

46. व्यक्तीच्या कोणत्याही विकासाच्या अवस्थेत व्यक्तीचे वर्तन हे अनुवंश व परिस्थितीचे फलित आहे. हे ............... आहे.

(A) आंतरसंबंधाचे तत्त्व

(B) आंतरक्रियेचे तत्त्व

(C) एकात्मिकरणाचे तत्त्व

(D) समान आकृतीबंधाचे तत्त्व

47. Anushka has just begun to use inversion and reciprocity in her thinking. So she must be in the ......... age group

(A) 1—5 years

(B) 6—10 years

(C) 11—15 years

(D) 16—20 years

48. While teaching teacher should have short term objectives that can be realized instead of long term objectives. This is related to ......... theory of learning.

(A) Tolman's

(B) Clark Hull

(C) Guthrie

(D) Lewin

47. अनुष्का विचार करताना व्यस्तीकरण आणि परस्परता यांचा संयुक्तपणे उपयोग नुकतीच करायला लागली आहे म्हणून तिचा वयोगट ............... असेल.

(A) 1—5 वर्षे

(B) 6—10 वर्षे

(C) 11—15 वर्षे

(D) 16—20 वर्षे

48. अध्यापन करताना शिक्षकाने दूरगामी उद्दिष्टांऐवजी सहजसाध्य होतील अशी तात्कालिक उद्दिष्टे ठेवावीत, हे विधान ................ उपपत्तीशी संबंधित आहे.

(A) टोलमन

(B) क्लॉर्क हल

(C) गुथ्री

(D) लेविन

49. After the teacher enters the classroom, students avoid making noise. This is an example of ............ type of learning.

(A) Discriminatory omission learning

(B) Escape learning

(C) Discriminated punishment learning

(D) Discriminated operant learning

50. Thurstone's Multifactor theory can be represented by the ............ formula.

(A) $I = G + (S_1 + S_2 + ........ S_n)$

(I = Intelligence, G = General factor, S = Specific factor)

(B) $I = [(G + S_1) + (G + S_2) + ......... (G + S_n)]$

(C) $I = [PMA_1 + PMA_2 + PMA_3 ...... PMA_8]$

(D) $I = [(G_1 + S_1) + (G_2 + S_2) + ......... (G_n + S_n)]$

49. शिक्षकांनी वर्गात प्रवेश केल्यानंतर विद्यार्थी गोंधळ करण्याचे टाळतात हे उदाहरण .................... प्रकारच्या अध्ययनाचे आहे.

(A) तौलनिक लोपन अध्ययन

(B) पलायन किंवा सुटका अध्ययन

(C) तौलनिक शिक्षा अध्ययन

(D) तौलनिक साधक अध्ययन

50. थर्स्टनची बहुघटक उपपत्ती या सूत्राच्या साहाय्याने दर्शविली जाते :

(A) $I = G + (S_1 + S_2 + ........ S_n)$

(I = बुद्धिमत्ता, G = सर्वसामान्य घटक, S = विशिष्ट घटक)

(B) $I = [(G + S_1) + (G + S_2) + ......... (G + S_n)]$

(C) $I = [PMA_1 + PMA_2 + PMA_3 ...... PMA_8]$

(D) $I = [(G_1 + S_1) + (G_2 + S_2) + ......... (G_n + S_n)]$

**ROUGH WORK**